शब्दांना सत्याची धार

# प्रहार



रत्नागिरी • सोमवार १२ ऑक्टोबर,२०२६ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० • वर्ष २२ • अंक ३३२ • पाने ८ • ₹ ५.०० | www.prahaar.in epaper.prahaar.in

# 'प्रहार'च्या लेखणीतून महाराष्ट्राच्या समृद्धीचा मार्ग खुला व्हावा!

## माजी मुख्यमंत्री खा. नारायण राणे यांची अपेक्षा; 'कोकण समृद्ध होईल, तेव्हाच माझी कार्यपूर्ती झाली असे मानेन'

**मुंबई (प्रतिनिधी) :**

एखादा माणूस श्रीमंत होण्यापेक्षा संपूर्ण कोकण समृद्ध होणे अधिक महत्त्वाचे आहे. कोकणसह महाराष्ट्रातील तरुणांनी नोकरीच्या शोधात भटकण्याऐवजी उद्योग-व्यवसायाच्या क्षेत्रात उतरून मोठे उद्योजक व्हावे, आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे आणि आपल्या कुटुंबाला सन्मानाने जगता यावे, यासाठी प्रयत्न करावेत. माझा कोकण समृद्ध होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने माझी कार्यपूर्ती झाली, असं मी म्हणेन. 'प्रहार' सुरू केला, योग्य ठिकाणी प्रहार केला आणि त्यातून समृद्धी निर्माण झाली, असे मला तेव्हाच म्हणता येईल. हे काम तुम्ही करावे, ही माझी अपेक्षा आहे. याच उद्देशाने मी 'प्रहार'ला पुढे आणले. आता या लेखणीच्या बळावर तुम्ही त्याचे आर्थिक स्वरूप बदलून दाखवावे. दैनिक 'प्रहार'च्या लेखणीतून जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याबरोबरच कोकणच्या आर्थिक समृद्धीचा मार्ग खुला व्हावा, हीच



माझी प्रामाणिक अपेक्षा आहे", अशी भावना दैनिक 'प्रहार'चे संस्थापक, माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार नारायण राणे यांनी रविवारी व्यक्त केली.

सत्याची धार आपल्या शब्दांतून जपत जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या दैनिक 'प्रहार'च्या मुंबई आवृत्तीचा १८वा वर्धापनदिन आणि त्यानिमित्त आयोजित 'प्रहार गणेशोत्सव स्पर्धा २०२६' व 'किलबिल चित्रकला स्पर्धा २०२६' यांच्या बक्षीस वितरण समारंभात ना. राणे बोलत होते. दादर पश्चिम येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृहात झालेल्या या सोहळ्याला दैनिक 'प्रहार'चे संचालक तथा राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे, माजी आमदार श्याम सावंत, दैनिक 'प्रहार'चे संपादक पद्मभूषण देशपांडे, महाव्यवस्थापक मनीष राणे, लेखा आणि मनुष्यबळ विभागाचे प्रमुख ज्ञानेश सावंत यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, स्पर्धक, पालक आणि मार्गदर्शक उपस्थित होते.

दैनिक 'प्रहार'च्या १८ वर्षांच्या वाटचालीचा आनंद व्यक्त करताना राणे म्हणाले की, वृत्तपत्र सुरू करताना हा प्रवास कसा होईल, पत्रकारितेसाठी आवश्यक असलेल्या सुविधा आणि साधनसामुग्री कशी उभी करता येईल, याबाबत अनेक प्रश्न होते. मात्र, आयुष्यात कोणतीही गोष्ट हाती घेतल्यानंतर ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करायचे, नुसता विचार करत बसायचे नाही, हे आपण ठरवले

(पान २ वर)



आगवेची श्री सुखादेवी

### नवरंग

| आजचा रंग | पांढरा |
|---|---|
| मंगळवार | लाल |
| बुधवार | निळा |
| गुरूवार | पिवळा |
| शुक्रवार | हिरवा |
| शनिवार | राखाडी |
| रविवार | जांभळा |
| सोमवार | मोरपिसी |



नवरात्र उत्सवानिमित्त रत्नागिरीतील श्री देवी भगवतीचे पहिल्या माळेनिमित्त सजलेले आकर्षक रुप.

# नाणार इंगळवाडीतील खाडीत बुडून ४ सख्ख्या भावंडांचा मृत्यू

**तिघांचे मृतदेह हाती, एका मुलीचा शोध सुरू**

**आई-वडिलांसोबत कालवे काढण्यासाठी गेली होती मुले**

**खोल खड्ड्याचा अंदाज न आल्याने घडली दुर्घटना**



**मृतांची नावे :**

१. मोहम्मद जुनेद भाटकर (वय ६ वर्षे, मुलगा) – मृतदेह प्राप्त
२. जुहेरिया जुनेद भाटकर (वय ९ वर्षे, मुलगी) – मृतदेह प्राप्त
३. बुशिरा जुनेद भाटकर (वय ११ वर्षे, मुलगी) – मृतदेह प्राप्त
४. माहिरा जुनेद भाटकर (वय १५ वर्षे, मुलगी) – शोधमोहीम सुरू

**राजन लाड / जैतापूर**

**राजापूर तालुक्यातील सागरी पोलीस ठाणे नाटे अंतर्गत येणाऱ्या नाणार इंगळवाडी येथे रविवारी (११ ऑक्टोबर) दुपारी काळीज पिळवटून टाकणारी दुर्दैवी घटना घडली. खाडीत कालवे काढण्यासाठी आई-वडिलांसोबत गेलेल्या एकाच कुटुंबातील पाच मुले खाडीच्या खोल पात्रात बुडाली. यातील एका मुलीला वाचवण्यात यश आले असले, तरी एका मुलासह तीन मुली अशा चार निष्पाप भावंडांचा बुडून मृत्यू झाला आहे. यापैकी तिघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून एका मुलीचा शोध अद्याप सुरू आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, इंगळवाडी येथील जुनेद भाटकर हे पत्नी हिना भाटकर व आपल्या मुलांसह रविवार ११ ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारे ३:३० वाजण्याच्या सुमारास नाणार परिसरातील खाडीमध्ये मुळे व कालवे काढण्यासाठी गेले होते. आई-वडील खाडीपात्रात कालवे काढत असताना, दुपारी ४:३० वाजण्याच्या सुमारास पाण्याच्या पात्रातील एका खोल खड्ड्याचा अंदाज मुलांना आला नाही. एकापाठोपाठ एक अशी पाचही लहान मुले खाडीच्या खोल पाण्यात ओढली गेली. मुलांचा आरडाओरडा ऐकून त्यांना वाचवण्याचा शर्थीचा प्रयत्न करण्यात आला, ज्यामध्ये एका लहान मुलीला सुदैवाने वाचवण्यात यश आले; मात्र इतर चार भावंडे पाण्याच्या खोल प्रवाहात बुडाली.

**प्रशासन व पोलिसांकडून शोधमोहीम वेगाने सुरू**

घटनेची माहिती मिळताच नाटे सागरी पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार तातडीने घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक ग्रामस्थ आणि मच्छीमारांच्या साहाय्याने तातडीने बचाव व शोधकार्य सुरू करण्यात आले. त्यातून मोहम्मद (६), जुहेरिया (९) आणि बुशिरा (११) या तिघांचे मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले आहेत, तर १५ वर्षीय माहिरा भाटकर हिचा शोध अद्याप खाडीपात्रात

(पान २ वर)

# संविधानाचा आधार घेत संस्थांचे अवमूल्यन करण्याचा डाव - मुख्यमंत्री फडणवीस

**'संविधान दाखवून संविधानाच्या विरोधात षडयंत्र'; काँग्रेस आणि सीजेपीच्या आंदोलनावर टीका**

**मुंबई (प्रतिनिधी) :**

संविधान हातात घेऊन आंदोलन करायचे आणि त्याच संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांचे अवमूल्यन करायचे, असा विरोधकांचा डाव आहे. देशात सध्या जे काही घडत आहे, त्यामागे एक सुनियोजित षडयंत्र दिसत आहे, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. काँग्रेस आणि कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीजेपी) आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. 'इंडिया टुडे'ला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

काँग्रेस असो किंवा सीजेपी, संविधान हातात घेऊन आंदोलन करणारे हे पक्ष भारतीय रिझर्व्ह बँक, सर्वोच्च न्यायालय आणि निवडणूक आयोग यांसारख्या संविधानाने

(पान २ वर)

# दुष्काळाची तीव्रता पाहून केंद्रीय पथकातील अधिकारी भावूक

**मुंबई (प्रतिनिधी) :**

राज्यातील दुष्काळाची भीषणता प्रत्यक्ष पाहिल्यानंतर केंद्रीय पाहणी पथकातील अधिकारी भावूक झाले. शेतात पिके हिरवी दिसत असली, तरी पावसातील दीर्घ खंडामुळे उत्पादनाची आशा मावळली आहे. पाण्याचे स्रोत आटू लागल्याने पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. राज्यातील परिस्थितीची पूर्ण कल्पना आली असून, केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही केंद्रीय पथकाने राज्य सरकारला दिली.

एल निनोच्या प्रभावामुळे राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण

(पान २ वर)

# दिपके, रांका आणि दास यांची सुटकेसाठी वर्षभर शांततेची हमी!

**५० हजारांच्या जामीन अर्जावर सशर्त सुटका**

**नवी दिल्ली :**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलनाची आक्रमक भाषा करणाऱ्या कॉक्रोचच्या नेत्यांना अखेर वर्षभर शांतता राखण्याची हमी देऊनच सुटका करून घ्यावी लागली. अभिजीत दिपके, आशुतोष रांका आणि सौरव दास या तिघांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचा जामीन अर्ज भरण्याच्या अटीवर रविवारी सोडण्यात आले. आंदोलन तीव्र करण्याच्या घोषणा करणाऱ्या सीजेपीच्या नेत्यांना आता वर्षभर शांतता आणि चांगली वर्तणूक राखण्याची अट पाळावी लागणार आहे.

(पान २ वर)

# रत्नागिरीत हायड्रोपोनिक गांजासह तिघांना अटक; ४ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त

**लेप्रसी कॉलनी परिसरात शहर पोलिसांची कारवाई; दोन दुचाकीही ताब्यात**

**रत्नागिरी (वार्ताहर) :**

रत्नागिरी शहरातील लेप्रसी कॉलनी परिसरात हायड्रोपोनिक गांजा बाळगल्याप्रकरणी तिघांविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साहिल समीर सोलकर (वय २७, रा. कोकणनगर), सुफियान अनिस गुहागरकर (वय २५, मूळ रा. पडवे, ता. गुहागर, सध्या रा. कोकणनगर) आणि यशराज राजेश देसाई (वय २४, रा. गणेश कॉलनी, हातखंबा) अशी संशयितांची नावे आहेत. या कारवाईत गांजासह दोन दुचाकी असा एकूण ४ लाख २० हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १२.३५ वाजण्याच्या सुमारास रत्नागिरी शहर पोलीस ठाण्याचे पथक हद्दीत गस्त घालत होते. त्यावेळी वुमन हॉस्पिटल ते चंपक मैदानाकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यालगत, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयासमोर

(पान २ वर)

# मुंबई-गोवा महामार्गावर तुरळ येथे भीषण अपघात

**राजापूरातील दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू, दुसरा गंभीर जखमी**

**संगमेश्वर (प्रतिनिधी):**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खड्ड्यांचा प्रश्न पुन्हा एकदा जीवघेणा ठरला असून, संगमेश्वर तालुक्यातील तुरळ परिसरात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील तरुणाला प्राण गमवावे लागले, तर त्याच्यासोबत प्रवास करणारा मित्र गंभीर जखमी झाला आहे. अनिकेत नारायण लाड (वय ३०, मूळ रा. येरडव, राजापूर) असे मृत तरुणाचे नाव असून, सचिन शांताराम गुरव (वय ४१, रा. निगुडवाडी, ता. संगमेश्वर) हे या अपघातात जखमी झाले आहेत. रविवारी सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, घटस्थापनेचा सण आपल्या गावात



साजरा करण्यासाठी अनिकेत लाड आणि सचिन गुरव हे दोघे शनिवारी रात्री मुंबईतील भोईवाडा येथून दुचाकीने निगुडवाडीच्या दिशेने रवाना झाले होते. त्यांचा प्रवास सुरू असतानाच रविवारी सकाळी तुरळ परिसरात त्यांच्या दुचाकीला अपघात झाला. महामार्गावरील खड्ड्यामुळे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने

(पान २ वर)

# महामार्गावर वाटूळ येथील वळणावर आयशर टेम्पो पलटी होऊन अपघात

**राजापूर (प्रतिनिधी):**

गोवा येथून मुंबईकडे रबर केमीकल घेऊन जाणारा आयशर टेम्पो महामार्गावर वाटूळ येथील वळणावर पलटी झाल्याने झालेल्या अपघातात टेम्पोसह आतील मालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. चालकाचा ताबा सुटल्याने हा अपघात झाला.

(पान २ वर)



# तुळशी येथे घरफोडी; सुमारे २ लाखांचा ऐवज चोरीला

**सोन्याच्या दागिन्यांसह तांब्या-पितळेची भांडी लंपास**

**मंडणगड (प्रतिनिधी) :**

तालुक्यातील तुळशी येथे बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरातील सोन्याचे दागिने, तांब्या-पितळेची भांडी आणि रोख रक्कम असा एकूण १ लाख ९५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मंडणगड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, तुळशी, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी येथील मूळ रहिवासी असलेले लखन परशुराम मोहिते (३३) हे नोकरीनिमित्त आपल्या कुटुंबासह पुणे येथे वास्तव्यास आहेत. सध्या ते हिंजवडी फेज १, पुणे येथे राहतात. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास मोहिते यांच्या बहिणी घराची साफसफाई करण्यासाठी गेल्या असता, घराचा दरवाजा उघडा असल्याचे तसेच कपाटातील साहित्य अस्ताव्यस्त पडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत त्यांनी लखन मोहिते यांना माहिती दिली. त्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष घरी येऊन पाहणी केली असता, अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाचा

(पान २ वर)

# ब्रेक फेल झालेल्या ट्रकचा भोस्ते घाटात अपघात; सुदैवाने जीवितहानी टळली!

**खेड (प्रतिनिधी) :**

मुंबई-गोवा महामार्गावरील भोस्ते घाटात ब्रेक फेल झालेल्या बारा चाकी ट्रकचा भीषण अपघात घडला. जांभा दगड घेऊन मुंबईच्या दिशेने जाणारा हा ट्रक घाटातील अवघड वळणाच्या उतारावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने महामार्गालगतच्या संरक्षक



भिंतीवर आदळला. त्यानंतर ट्रक

(पान २ वर)

# पुढील वर्षीपासून 'प्रहार भूषण' पुरस्कार पुन्हा सुरू करणार

**मंत्री नितेश राणे यांची घोषणा; 'प्रहार'च्या मुद्रित आणि डिजिटल टीमचे केले कौतुक**

**मुंबई :**

समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या आणि निःस्वार्थ योगदान देणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी दैनिक 'प्रहार'च्या वतीने पुढील वर्षापासून पुन्हा 'प्रहार भूषण' पुरस्कार सोहळा सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री तथा दैनिक 'प्रहार'चे संचालक नितेश राणे यांनी रविवारी केली. 'प्रहार'च्या स्थापनेमागे माजी




मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार नारायण राणे यांची दूरदृष्टी असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली वृत्तपत्राने महाराष्ट्राच्या पत्रकारिता क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. मुद्रित वृत्तपत्राबरोबरच डिजिटल माध्यमातही 'प्रहार'ची वाटचाल प्रभावी असून, डिजिटल माध्यमावरील प्रेक्षकसंख्या दहा लाखांहून अधिक झाल्याचे त्यांनी सांगितले.

दैनिक 'प्रहार'चा १८ वा वर्धापनदिन आणि 'प्रहार गणेशोत्सव स्पर्धा २०२६' तसेच 'किलबिल चित्रकला स्पर्धा २०२६' यांच्या बक्षीस वितरण समारंभानिमित्त दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर

(पान २ वर)

### 'प्रहार भूषण' पुन्हा सुरू होणार

'प्रहार भूषण' पुरस्काराची संकल्पना काही वर्षांपूर्वी खा. नारायण राणे यांनी मांडली होती. समाजातील विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या, मेहनत घेणाऱ्या आणि निःस्वार्थपणे योगदान देणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. माजी मुख्यमंत्री विद्यमान खासदार नारायण राणे यांची परवानगी घेतल्यानंतर पुढील वर्षीपासून 'प्रहार भूषण' पुरस्कार सोहळा पुन्हा आयोजित करण्यात येईल, अशी घोषणा मंत्री नितेश राणे यांनी केली.

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करताना, विधिमंडळात तसेच मंत्रालयात विविध व्यक्तींशी संवाद साधताना 'प्रहार'च्या कामाचे कौतुक ऐकायला मिळते, असे सांगून त्यांनी समाधान व्यक्त केले. काही नागरिकांकडून आणि अधिकाऱ्यांकडून वृत्तपत्राच्या कामाबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया मिळतात. नारायण राणे यांच्या विचारांतून घडलेल्या या वृत्तपत्राला महाराष्ट्रात स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी योगदान देणाऱ्या प्रत्येक सहकाऱ्याचे मनापासून अभिनंदन करतो, असे ते म्हणाले.

# जिल्ह्यात ४३६ सार्वजनिक तर ६५ खासगी ठिकाणी दुर्गेच्या मूर्तींची प्रतिष्ठापना



घुडेवठार येथे प्रतिष्ठापित करण्यात आलेली देवीची आशीर्वादरुपी मूर्ती.

**घटस्थापनेने नवरात्रौत्सवाच्या अभूतपूर्व उत्साहाला सुरूवात**

**रत्नागिरी:**

आदिशक्तीच्या घटस्थापनेने संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्यात नवरात्रौत्सवाच्या अभूतपूर्व उत्साहाला सुरूवात झाली आहे. ११ ऑक्टोबर रोजी रत्नागिरी जिल्ह्यात ४३६ सार्वजनिक तर ६५ खासगी अशा एकूण ५०१ ठिकाणी दुर्गेच्या भव्य मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. याचसोबत ४२४ सार्वजनिक आणि तब्बल १९,३१५ खासगी ठिकाणी घरगुती घटस्थापना करून प्रतिमा पूजन करण्यात आले. ग्रामीण भागातील ग्रामदेवतांच्या मंदिरांपासून ते शहर-वाडीवस्त्यांपर्यंत आदिशक्तीच्या स्वागतासाठी जय्यत तयारी करण्यात आली होती.

नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने गरब्याची धुमश्चक्री रंगणार असून, भक्ती, शक्ती आणि

(पान २ वर)